# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक 2007/(322/07)विषि–4 महाराष्ट्र अधिनियम, 1994(1994 चा महा. 35) या कलम 3 च्या पोटकलम(2) अन्वये दिनांक 27 सप्टेंबर, 2011 रोजी स्थापीत राज्य विद्यापीठ

(विद्या विभाग )

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली – 442605 फोन:07132 – 216554, 223104,223323

जा.क्र/गोविग/विद्या/६४०/२०१६ दिंनाक :१५/१०/२०१६

प्रति,

मा.प्राचार्य,
शिक्षण व शारीरिक शिक्षण महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**विषय:— शैक्षणिक वर्ष २०१६—१७ च्या प्रवेशित विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्का करिताचा संकेतस्थळावरील शुल्क निर्धारण अर्ज भरणेबाबत.**

**संदर्भ:—** मा.सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती यांचे पत्र क्र. शिशुस/शु.नि.अर्ज/२०१६/६२८, दि.४/१०/२०१६ चे पत्र.

**महोदय,**

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१६—१७ च्या प्रवेशित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क निर्धारणाकरिताचा ऑनलाईन अर्ज शिक्षण शुल्क समिती व उच्च शिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले असून अर्ज भरण्यासाठी सोबत वेळापत्रक जोडलेले आहेत. तरी सर्व संबंधित महाविद्यालयांनी संदर्भीय पत्राचे अवलोकन करून वेळापत्राकाप्रमाणे विहीत मुदतीत अर्ज भरण्याची कार्यवाही करावी.

धन्यवाद!

सहपत्र:— संदर्भपत्र व वेळापत्रक

(डॉ.विजय सिल्हारे)
उपकुलसचिव(विद्या)
गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली

महाराष्ट्र शासन
उच्च शिक्षण संचालनालय
**शिक्षण शुल्क समिती,मुंबई**
( विनाअनुदानीत व कायमविनाअनुदानीत शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांसाठी)
कार्यालयाचा पत्ता—शासकीय अध्यापक महाविद्यालय, एलफिन्स्टन तांत्रीक विद्यालय आवार,
१ ला मजला, ३ महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई—४०० ००१
E-mail :- sssbedmed@gmail.com / jd.hesss-mh@gov.in Tel -022 22694478 Web-www.sssmumbai.org

शिशुस/शु.नि.अर्ज./२०१६/६२८ दि.०८.१०.२०१६

प्रति,

सर्व प्राचार्य,
राज्यातील शासकीय व अशासकीय विनाअनुदानित व कायम विनाअनुदानीत शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालये तसेच अकृषी विद्यापीठाचे केंद्र

विषयः— शैक्षणिक वर्ष २०१६—१७ च्या प्रवेशीत विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्का करिताचा संकेतस्थळावरील शुल्क निर्धारण अर्ज भरणेबाबत.

उपरोक्त विषयान्वये **राज्यातील विनाअनुदानित व कायम अनुदानित शिक्षण प्रशिक्षण व शारिरीक शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमाचे** (बी.एड, बी.एड. इंटीग्रेटेड, एम.एड, बी.पी.एड., एम.पी.एड) **शैक्षणिक वर्ष २०१६—१७ च्या प्रवेशीत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क निर्धारणाकरिताचा ऑनलाईन अर्ज शिक्षण शुल्क समिती व उच्च शिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावर** प्रसिध्द करण्यात येत आहे. संबंधित सर्व महाविद्यालयांना सदर अर्ज भरण्यासाठी सोबत जोडलेले वेळापत्रक पहावे. **अर्जातील माहिती अचूक व संपूर्ण भरणे बंधनकारक आहे** अन्यथा याबाबत अपूर्ण किंवा चूकीची माहिती दिली या कारणास्तव होणाऱ्या कार्यवाहीस महाविद्यालय जबाबदार राहील. तसेच महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय दि.०५.०७.२०१३ व दि.१९.०१.२०१६ मध्ये नमुद केल्याप्रमाणे **नोंदणी शुल्क आर.टी.जी.एस./एन.ई.एफ.टी. व्दारे बॅक ऑफ इंडिया, काळबादेवी शाखा, मुंबई खाते क्रमांक—002420110001315 आय.एफ.एस.सी.क्रमांक BKID0000024** येथे जमा करावे.

तरी उपरोक्त महाविद्यालयांनी तसेच विद्यापिठाच्या केंद्रांनी **संपूर्ण अर्ज वेळापत्रकात नमुद केल्याप्रमाणे विहीत मुदतीत भरणे आवश्यक आहे. तद्नंतर प्रिंट काढून सोबत आवश्यक ती कागदपत्रे अर्जामध्ये नमुद केलेल्या पृष्ठक्रमांकावर जोडून या कार्यालयास दि.०२.११.२०१६ पर्यंत तीन प्रतित** ग्यायरल बाईडींग केलेले सादर करणे आवश्यक आहे.

सहसंचालक,
शिक्षण शुल्क समिती,
मुंबई

महाराष्ट्र शासन
उच्च शिक्षण संचालनालय

# शिक्षण शुल्क समिती,मुंबई

( विनाअनुदानीत व कायमविनाअनुदानीत शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांसाठी)
कार्यालयाचा पत्ता–शासकीय अध्यापक महाविद्यालय, एल्फिन्स्टन तांत्रीक विद्यालय आवार,
१ ला मजला, ३ महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई–४०० ००१
E-mail :- sssbedmed@gmail.com / jd.hesss-mh@gov.in Tel -022 22694478 Web-www.sssmumbai.org

## राज्यातील विनाअनुदानीत व कायमविनाअनुदानीत शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालये व विद्यापीठाची केंद्र यांचे साठी शिक्षण शुल्क समितीचे २०१६–१७ या वर्षाचे शुल्क निश्चितीबाबतचे वेळापत्रक

| अ.क्र. | तपशिल | कालावधी | |
|---|---|---|---|
| | | पासून | पर्यत |
| १ | आज्ञावली संकेतस्थळावर अपलोड करणे. | ०५ ऑक्टोबर २०१६ | — |
| २ | आज्ञावलीतील अर्ज अचूक भरून सादर करणे | ०५ ऑक्टोबर २०१६ | २० ऑक्टोबर २०१६ |
| ३ | आज्ञावलीतील भरलेले अर्ज ३ प्रतीत स्वाक्षरीनीशी व आधारीत आवश्यक कागदपत्रांसह सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती, मुंबई या कार्यालयास हार्ड कॉपी मध्ये सादर करणे. | ०५ ऑक्टोबर २०१६ | ०५ नोव्हेंबर २०१६ |
| ४ | प्राप्त अर्जाची छाननी करून त्रुटी असल्यास ई–मेलव्दारे कळविण्यात येतील.(त्या तात्काळ पूर्ण करणे महाविद्यालयांना/केंद्रांना बंधनकारक राहील) | ०७ ऑक्टोबर २०१६ | ०५ नोव्हेंबर २०१६ |
| ५ | छाननी झालेले अर्ज अभ्यासक्रमनिहाय शुल्क मान्यतेसाठी समितीसमोर ठेवणे. | २० नोव्हेंबर २०१६ | २० डिसेंबर २०१६ |
| ६ | शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांचे व्दिवर्षीय अभ्यासक्रमांचे शैक्षणिक वर्ष २०१५–१७ साठी मान्यताप्राप्त शिक्षण शुल्क संकेतस्थळावर जाहीर करणे. | २१ डिसेंबर २०१६ – २६ डिसेंबर २०१६ दरम्यान | |

Bhamdhai
3/10/2016
सहसंचालक,
शिक्षण शुल्क समिती,
मुंबई

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
विद्या विभाग
आवक क्र. 442 दि. 14/10/16
जावक क्र. दि. ..........

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
महाविद्यालयीन विभाग
आवक क्र. 628 दिनांक 93/10/16
जावक क्र. 9242 दिनांक 98/10/16

राज्यातील शासकीय/अशासकीय अनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील बी.एड अभ्यासक्रमांच्या शुल्कात सुधारणा करण्याबाबत.

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. 11409 दि. 9.10.16
जावक क्र. 5250 दि. 5/10/16

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः बीएड-४६१५/प्र.क्र.१२४/१५/मशि-२**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
तारीखः १९ सप्टेंबर, २०१६.

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ
आवक क्र. 3599 दिनांक 6/10/16
जावक क्र. 1926 दिनांक 13/10/16

<u>वाचा</u> :

१) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.एसीटीसी-१०००/(१२२/२०००)/मशि-३, दिनांक २९ डिसेंबर, २०००.
२) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.एनजीसी-२००१/बी.एड./(४४२/०१)/मशि-३, दिनांक २४ मे, २००२.
३) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.बीएड-४६१५/प्र.क्र.१२४/१५/मशि-२, दिनांक २७ नोव्हेंबर, २०१५.
४) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.उशिसं/२०१५-१६/शिक्षण शुल्क/प्र.क्र.१२४/बी.एड, दिनांक २१.३.२०१६.

<u>प्रस्तावना</u> :

राज्यातील शासकीय व अशासकीय अनुदानित अध्यापक महाविद्यालयातील बी.एड अभ्यासक्रमाच्या शिक्षण शुल्काचे दर संदर्भ क्र.२ येथील दिनांक २४ मे, २००२ च्या शासन निर्णयान्वये विहीत करण्यात आले आहेत. त्यानुसार राज्यातील शासकीय व अशासकीय अनुदानित अध्यापक महाविद्यालयातील बी.एड अभ्यासक्रमाचे शिक्षण शुल्क प्रतीवर्षी मागील वर्षीच्या शुल्कामध्ये ५% इतकी वाढ करुन सन २००६-०७ पर्यंत पाच वर्षांच्या कालावधीसाठी निश्चित करण्यात आले होते. त्यानंतर सदर शुल्काचे पुनर्विलोकन करण्यात आलेले नाही वा सुधारित शुल्कास मंजूरी देण्यात आलेली नाही. त्यामुळे अद्यापपर्यंत प्रत्येक वर्षी ५% वाढ करुन शासकीय/अशासकीय अनुदानित अध्यापक महाविद्यालयांचे शिक्षण शुल्क संचालक, उच्च शिक्षण यांचेकडून निश्चित करण्यात येते. सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षासाठी बी.एड अभ्यासक्रम २ वर्षांचा झाला असल्याने सदर शुल्क २ वर्षामध्ये विभागून रु.९,४२८/- प्रतिवर्ष असे प्रस्तावित करण्यात आले होते. दिनांक ६.७.२०१५ रोजीच्या बी.एड प्रवेश नियमावलीच्या शासन निर्णयान्वये रु.९,४२८/- प्रतिवर्ष एवढे अंतरिम शुल्क सन २०१५-१६ आणि २०१६-१७ साठी निश्चित करण्यात आले आहे. सदर शुल्कामध्ये वाढ करण्याकरिता संदर्भ क्र.३ येथील शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या समितीच्या शिफारसी विचारात घेऊन, संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी संदर्भ क्र.४ येथील पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने

३. शैक्षणिक वर्ष सन २०१५-१६ मध्ये शासकीय/अशासकीय अनुदानित महाविद्यालयांतील बी.एड अभ्यासक्रमांमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांकडून अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या वर्षामध्ये (सन २०१६-१७) सुधारित शिक्षण शुल्क व इतर शुल्क आकारण्यास शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०९१९१५३८१४६५०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Urmila Vaibhav Joshi

Digitally signed by Urmila Vaibhav Joshi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Section Officer, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Urmila Vaibhav Joshi
Date: 2016.09.19 15:41:48 +05'30'

**(उर्मिला जोशी)**
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

**प्रत,**

१. संचालक, उच्च शिक्षण, महराष्ट्र राज्य, पुणे,
२. सर्व विभागीय सह संचालक, उच्च शिक्षण,
३. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे,
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
५. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
७. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
८. सर्व प्राचार्य, शासकीय/अशासकीय अनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालये (संचालक, उच्च शिक्षण यांच्यामार्फत)
९. मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
१०.मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
११.प्रधान सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
१२.उप सचिव (म.शि.) यांचे स्वीय सहाय्यक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
१३. निवडनस्ती- कार्यासन मशि-२.